हिंदी गीतकारांना कृष्णावर गीतं लिहिणं मनापासून आवडत असावं. 'कान्हा के बिना गाना क्या...' असं एका गीतकारानेच गंमतीने म्हटलंय.

□ अजित पोपट

जीर्णशीर्ण वस्त्रांतला एक गरीब गावंढळ शहरात येतो. तिथल्या गगनचुंबी इमारती, भपकेबाज लोक आणि सरसर धावणाऱ्या मोटारी पाहून चक्रावतो. त्याच्या घशाला कोरड पडलेली असते. पण कोणाकडे पाणी मागायचं धाडस त्याला होत नाही. रात्रभर तो एका सोसायटीत ठेचकाळत, लपत-छपत राहतो. त्यावेळी त्याला प्रतिष्ठित पांढरपेशा घरांतली अनेक कृष्णकृत्यं समजतात. पहाटे एक स्त्री मुखाने हरीनाम घेता घेता विहिरीचं पाणी काढताना दिसते. ती त्याला पाणी पाजते. या दृश्यातलं ते गीत पुढे खूप लोकप्रिय झालं. बोल होते, *'जागो मोहन प्यारे जागो...'*



असाच एक प्रसंग. परिस्थितीने गुंड बनलेला एक तरुण चोरी करण्यासाठी प्लेगग्रस्त गावातल्या एका घरात येतो. तिथल्या विधवा वहिनीवर बळजोरी करणाऱ्या वासनांध दिराच्या तावडीतून त्या अबलेची



सत्यम् शिवम् सुंदरम्मध्ये पद्मिनी कोल्हापुरे

कृष्णगीतांच्या मधुर रचना...

सुटका करतो. तिला आपल्या घरात आसरा देतो. पुढे वस्तीतल्या एका घराला आग लागते. त्यात अडकलेल्या छोट्या मुलीला वाचवताना त्याचे हात भाजतात. तेव्हा त्या तरुणीसह सगळी वस्ती त्या तरुणाच्या जीवनासाठी परमेश्वराला आळवताना गाऊ लागते—

सुनले पुकार आयी आज तेरे द्वार लेके
आसुओं की धार मेरे सावरे...


पहिलं गीत राज कपूरच्या *जागते रहो*मधलं आहे. नरगिसवर ते चित्रित करण्यात आलंय. लताने गायलंय. तर दुसरं *फूल और पत्थर*मधलं मीनाकुमारीवर चित्रित झालंय. ते आशा भोसलेने गायलंय. दोन्ही गीतांत एक गोष्ट समान आहे, कृष्ण! नुकतीच जन्माष्टमी झाली. त्यानिमित्ताने 'कृष्ण कन्हैया'च्या भक्तीची हिंदी चित्रपटांतली लोकप्रिय पण यापूर्वी 'जी'मध्ये चर्चा न झालेली काही गीतं पाहू या.

असे बरेच प्रसंग सांगता येतील. साधूच्या वेशात बरेच चोर देवाच्या मूर्तीला घातलेले हिरे-मोत्याचे मौल्यवान दागिने चोरण्याच्या हेतूने देवळात प्रवेश करतात. त्यांच्या टोळीत एक महिला असते. ती मीरेच्या वेशात असते. कुठल्या तरी दडपणाखाली ती अनिच्छेने या योजनेत त्यांना साथ देत असते. तिच्या मनाचं आक्रंदन गीताच्या रूपात बाहेर येतं—

ओ री ओ मोंसे मोरा श्याम रूठा, काहे मोरा भाग फूटा
काहे मैंने पाप ढोये, अंसुअन बीज बोये
छूप छूप मीरा रोये, दर्द न जाने कोई...

कल्याणजींनी एकदा या गीताबद्दलच्या आठवणी सांगताना म्हटलं होतं, 'गीत अगदी संथ चालीने सुरू होतं. नंतर हळूहळू त्याची चाल जलद होत जाते. त्यासरशी आपली उत्सुकताही वाढू लागते. गुंड गाभाऱ्याच्या दिशेने पुढे सरकू लागतात तसतशी गीताची चाल अधिक जलद होते. शेवटी 'गोविंद बोलो हरी गोपाल बोलो राधारमण हरी गोपाल बोलो...' या नामस्मरणाने ती टीपेला पोहोचते आणि अचानक गीत पूर्ण होतं. *जॉनी मेरा नाम*चं हे गीत चित्रित करण्यात आलं तेव्हा हेमामालिनी खूश झाली होती. गीतातील लयवैविध्य तिच्यासारख्या कसलेल्या नर्तकीला आव्हान देणारं

*जागते रहो*मध्ये राज कपूर - नरगीस



वाटलं. शेवटच्या धूनला तर तिने कमाल केली होती.'

भक्तावर जेव्हा जेव्हा अडचण येते तेव्हा तेव्हा देव त्याच्या मदतीला धावून जातो असं दृश्य अनेक पौराणिक चित्रपटांतून हमखास दिसायचं. १९५० आणि १९६० च्या दशकात तर हमखास असा एखादा प्रसंग चित्रपटांत दाखवला जायचा. १९६८मध्ये रामानंद सागरांचा *आँखे* पडद्यावर झळकला. त्यात देशविघातक कारवाया करणाऱ्या टोळीला पकडण्याची कथा आहे. वरिष्ठ पोलीस अधिकारी नासीर हुसेन यांच्या घरात त्यांची मुलगी(कुमकुम) हिच्या मदतीने शत्रूच्या टोळीतली ललिता पवार शिरकाव करते. कुमकुमच्या मुलाचं अपहरण झालेलं असतं. म्हणून ती या टोळीला नाइलाजास्तव मदत करत असते. या ठिकाणी रामानंद सागरनी कुमकुमच्या तोंडी एक भक्तिगीत घातलं–

मेरी सुनले अरज बनवारी, तेरे द्वार खडी दुखियारी...

दुसऱ्या अंतऱ्यात आईच्या हृदयाची वेदना या शब्दांत व्यक्त होते–

छीन गया मेरी आस का मोती
खो गई इन नैनन की ज्योती
तेरे जगत में भटक रही हूं
मैं ममता की मारी - तेरे द्वार
जय जय मोहन मदन मुरारी...

अंध भक्त कवी सूरदास यांनी कृष्णाच्या बाललीलांचं वर्णन करणारे अनेक छंद लिहिले. त्यावरून हिंदी चित्रपटांतल्या गीतकारांनी बरीच गीतं तयार केली. उदा. सूरदासच्या एका पदात छोटा कृष्ण यशोदेला विचारतो की दाऊ(बलराम) आणि मी दोघं भाऊ असताना दाऊ गोरा आणि मी काळा असं का? हा प्रश्न राज कपूरला फार आवडला. सत्यम् शिवम् सुंदरम्मध्ये पं. नरेंद्र शर्मांकडून त्याने या कल्पनेवर आधारित सुरेख गीत लिहून घेतलं. त्याचे बोल आठवले ना?

यशोमती मैयासे बोले नंदलाला
राधा क्यूं गोरी, मैं क्यूं काला...

कृष्णाच्या बाललीलांवर अशी अनेक गीतं हिंदी चित्रपटांत सापडतील. राजेश खन्ना-शर्मिला टागोरच्या अमर प्रेममध्येही असंच एक गीत आहे. यात शर्मिलाने वेश्येची भूमिका साकारलीय. प्रत्येक स्त्रीमध्ये एक यशोदा लपलेली असते असा विचार मांडणारं हे दृश्य. शर्मिलाच्या तोंडी शेजारी राहणाऱ्या एका खट्याळ मुलावर वात्सल्याचा वर्षाव करणारं हे मधुर गीत पहा–

बडा नटखट है रे कृष्ण कन्हैया
का करे यशोदा मैया हो
ढूंढेरी अंखियां उसे चहुं ओर
जाने कहां छूप गया नंदकिशोर...

राजेश खन्ना-शर्मिला या जोडीचा आणखी एक चित्रपट *छोटी वहू*. यात मोठ्या जावेच्या मुलावर धाकटी जाऊ आईपेक्षा अधिक प्रेम करते. ते मूलही जन्मदात्यांपेक्षा प्रेम करणाऱ्या काकीकडे जास्त ओढ घेतं. इंदिवरच्या या गीताला कल्याणजी-आनंदजींनी सुंदर चाल दिली. किशोरकुमारच्या स्वरातलं हे गीत मनाला स्पर्शून जातं.

रे कन्हैया किसको कहेगा तू मैया
जिसने तुझको जनम दिया है
जिसने तुझको पाला...



*गीत गाता चल*मध्ये सचिन

राजश्री फिल्म्सने सचिन आणि सारिकाला घेऊन बनवलेल्या *गीत गाता चल*मधलं हे गीत आणि संगीत दोन्ही रवींद्र जैनचं. यातही सूरदासच्या साध्या सरळ रचनेवर आधारित शब्द आहेत.

श्याम तेरी बंसी पुकारे राधा नाम
लोग करे मीरां को यूं ही बदनाम...

तशी प्रत्येक दशकात कान्हाने चित्रपट निर्मात्यांना साथ दिली आहे. कथानकानुसारही कृष्णाची आळवणी कशी बदलत जाते पहा–

संकट में है आज वो धरती
जिस पर तुने जनम लिया
पूरा कर दे आज वचन वो
गीता में जो तुने दिया
तुज बिन मोहन कोई नहीं है
भारत का रखवाला रे
बडी देर भयी नंदलाला
तेरी राह सजे ब्रिजबाला...

भगवद्गीतेत एक श्लोक आहे. त्याची एक ओळ अशी आहे. 'धर्म संस्थापनार्थाय संभवामी युगे युगे...' १९६५मध्ये प्रदर्शित झालेल्या दिग्दर्शक भीमसिंगच्या खानदानमधल्या या गीताला रवीने संगीत दिलं.

तारणहार, खोडकर, भक्तांचा कनवाळू अशी कृष्णाची अनेक रूपं आहेत. कथेच्या अनुषंगाने ती ती रूपं आळवली जातात. कन्हैयाची अनेक गीतं साहिर लुधियानवी किंवा शकील बदायुनींसारख्या मुस्लीम गीतकारांनी लिहिली. कृष्णभक्तीत जातीयवाद कधी आड आला नाही. कृष्ण खऱ्या अर्थानं कॉस्मोपॉलिटन देव ठरलाय!

निदान चित्रपटसृष्टीत तरी.